महासागर
नागपूर वृत्तसागर
■ गुरुवार, दिनांक २४ जुलै २०२५ ■





# वाडी नगर परिषद क्षेत्राला समस्यातून मुक्त करा

## मुख्याधिकारी यांना रमेशचंद्र बंग यांच्या नेतृत्वात निवेदन

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २३ :

वाडी नगर परिषद क्षेत्रात समस्याचा डोंगर वाढला असुन त्या समस्या त्वरीत निकाली काढा. अशा आशयाचे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस ( शरद पवार गट ) पक्षाच्या वतीने माजी मंत्री रमेशचंद्र बंग यांच्या नेतृत्वात मुख्याधिकारी डॉ. ऋचा धाबर्डे यांना बुधवार २३ जुलै रोजी दिले.



सिमेंट व डांबरीकरणाचे रस्ते दुरस्त करणे, सार्वजनिक उद्यानामध्ये होत असलेल्या समाज विरोधी समस्यांचे निवारण व उद्यानाच्या मुख्य प्रवेशद्वाराला कुलूप लावणे, डी.पी. प्लॅन मध्ये आंबेडकर नगरच्या स्मशानघाटाला लागून घनकचरा डंपींग यार्ड दाखविण्यात आलेले असून ते रद्द करणे , विश्वनाथ बाबा हायस्कुल जवळील घनकचरा खत प्रक्रिया करण्यात येत असून ते ठिकाण बंद करून दुसरीकडे हटविणे,नगर परिषद वाडी क्षेत्रात उघडयावर मांस विक्री व मासे विक्री केंद्र खुल्यावर होत असून मटन मार्केट व मासे मार्केट बांधकाम करणे, आंबेडकर नगर सार्वजनिक शौच्छालय तसेच शिवमंदीरच्या मागे असलेल्या खदानीची साफसफाई करणे, उड्डाण पुलाच्या खालील स्ट्रिट लाईट सुरू करणे,दौलतवाडी येथील पांडे पासून सुरेश झाडे यांचा प्लॉट ते हनुमान मंदीर पर्यंत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे, सेवाभावी सोसायटी येथील सावंत यांचे घरापासून नाल्यापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे, वेणानगर ब्लु बेल्स कॉन्व्हेंट ते दत्ताजी ते ठाकरे किराणा दुकान पर्यंत नाली बांधकाम करणे, राहुल ट्रान्सपोर्ट ते सतिश घारपडे यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे.खोब्रागडे ते हॉस्पीटल पर्यंत सिमेंट रस्ता करणे. सतिश घोरपडे ते अमरावती मार्ग टच नाला बांधकाम करणे. जानराव राऊत ते तवक्कल ले आऊट मेन रोड सिमेंट रस्ता बांधकाम करणे,गायकवाड वकील यांचे घरापासून ते तवक्कल ले आऊट पर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे, अशोक माने ते मंदीर पर्यंत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे,वाडी शिवाजीनगर येथील गडर लाईनचे काम मंजूर असून ते त्वरीत सुरू करणे आदी सर्व समस्यांच्या मागण्या निवेदनातुन देण्यात आल्या.

यावेळी माजी नगरसेवक राजेश जैस्वाल, माजी नगराध्यक्ष प्रेमनाथ झाडे, वाडी शहर अध्यक्ष वसंतराव इखनकर, माजी नगरसेवक श्याम मंडपे,माजी सरपंच अशोक माने, कार्याध्यक्ष दिनेश उईके ,कार्याध्यक्ष हिम्मत घडेकर, सुशिल शर्मा, सुनिल सिंग, जिल्हा सचिव दिलीप दोरखंडे, जिल्हाध्यक्ष कामगार सेल योगेश चरडे, प्रविण सिंग, प्रविण लिचडे, सुनंदा ठाकरे, माधुरी बोदोले, ताराबाई घरडे, अशोक पैदलवार, रत्नमाला मल्लेवार,सोनु चरडे, सचिन मुने, नरेंद्र राऊत, श्रावण काकडे, रविंद्र गावंडे,नंदकिशोर बडवाईक, निलकंळ रासेकर, चंदु इंगोले, सुभाष घाटोळे उपस्थित होते.

# वसुंधरा दिन व वृक्षारोपण युवा समुपदेशनाने साजरा

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २३ :

सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे यांच्या समतादूत प्रकल्प तालुका रामटेकच्या वतीने ॲड. नंदकिशोर जयस्वाल कनिष्ठ महाविद्यालय, काचुरवाही येथे वसुंधरा दिन दिनाचे निमित्त साधून वृक्षारोपण व युवा समुपदेशन कार्यक्रमाचे प्राचार्य सुनील कोल्हे यांच्या मार्गदर्शनात आयोजन करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी महिला समुपदेशक पोलीस स्टेशन रामटेक येथील दीपा चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना पोक्सो कायदा विषयी मार्गदर्शन केले व युवकांची नेमकी दिशाभूल व समाजात कशा पद्धतीने फसवणूक केले जाते याबाबत विविध सोदाहरण सह मार्गदर्शन केले.



रामटेक तालुक्याचे समतादूत राजेश राठोड यांनी विद्यार्थ्यांना वास्तविक प्रेम, शिक्षण व करिअर या संकल्पना बाबत मार्गदर्शन केले. तसेच या कार्यक्रमात युवकांची उदासीनता, चुकीचे पडणारे पाऊल, घरात असलेल्या आत्महत्या, सोशल मीडिया द्वारे होणारी दिशाभूल व फसवणूक तसेच विविध समस्या याबाबत विचार मंथन करण्यात आले. वरिष्ठ शिक्षक भारत बसीने हे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमाचे संचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख माया मुसळे यांनी केले तर आभार फारूख शेख यांनी मानले. याप्रसंगी जांभूळ, शमीवृक्ष, वड व शिसम या वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. तत्पूर्वी सामूहिक पद्धतीने शासकीय वृक्ष संवर्धनाची प्रतिज्ञा घेण्यात आली.

कार्यक्रमाला शिक्षक वृंद देवराव धुर्वे, जीवन राऊत, भारत भोवते, अंजली चकोले, मुरलीधर मोहनकर, प्रगती अडकणे, पंढरी कडू, सुप्रिया गजभिये, रितेश लोंढे व असंख्य विद्यार्थी उपस्थित होते.सदर उपक्रमासाठी बार्टीचे महासंचालक सुनील वारे, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नागपूर सुकेशिनी तेलगोटे तसेच हृदय गोडबोले यांचे मार्गदर्शन लाभले.

# लोकमान्य टिळक व चंद्रशेखर आझाद यांना मनपातर्फे विनम्र अभिवादन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

स्वराज्य हा माझा जन्मसिध्द अधिकार आहे, आणि तो मी मिळवणारच! अशी सिंहगर्जना करणारे भारतीय स्वातंत्र्यलढयाचे थोर स्वातंत्र्यसेनानी, राष्ट्रभक्त लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि भारतीय स्वातंत्र्यलढयातील थोर क्रांतीकारक चंद्रशेखर आझाद यांच्या जयंती निमित्त नागपूर महानगरपालिकेच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले.

सेन्ट्रल एव्हेन्यू रोड स्थित थोर क्रांतीकारक चंद्रशेखर आझाद यांच्या पुतळ्याला आमदार प्रवीण दटके, व माजी महापौर दयाशंकर तिवारी यांनी माल्यार्पण करून करुन विनम्र अभिवादन केले. मनपा मुख्यालयात आयोजित कार्यक्रमात मनपाचे अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर यांनी प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन विनम्र अभिवादन केले. याप्रसंगी उपायुक्त विजया बनकर, सहायक आयुक्त श्याम कापसे, अतिरिक्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार, जनसंपर्क अधिकारीमनिष सोनी कार्यकारी अभियंता राजीव गौतम, उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे,, अमोल तपासे, प्रमोद हिवसे, राजेश लोहितकर, विनोद डोंगरे, प्रकाश खानझोडे उपस्थित होते. तसेच गांधीसागर तलाव जवळील लोकमान्यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करण्यात आले.

# माजी आमदार रेड्डींनी वृक्षारोपण करुन फडणवीसांचा वाढदिवस केला साजरा



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २३ :

भारतीय जनता पक्ष रामटेक विधानसभाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवसानिमित्त "एक पेड मा के नाम" अभियान राबवुन नागपूर जबलपूर राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजूला मनसर ते कन्हान वृक्षरोपण रामटेक विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार डी. मल्लिकार्जुन रेड्डी यांचा हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी जिल्हा महामंत्री उदयसिंग यादव, संजय मुलमुले,माजी नगराध्यक्ष दिलीप देशमुख, व्यंकट कारेमोरे, रजत गजभिये, राहुल किरपान, बिरेंद्र सिंग, योगेश मात्रे, नंदलाल बावनकुळे, विवेक तोतडे, करीम मालाधारी, उमेश पटले,आलोक मानकर, पप्पू यादव, धर्मेंद्र शुक्ला, बैजू खरे, ज्ञानेश्वर ढोक, सरपंच रणवीर यादव,गांधी रेड्डी, ज्योती कोल्हेपरा, कविता मुलमुले, कांचनलता बंधाटे, उज्वला धमगाये, स्नेहा गावंडे, चित्रा धूरई, शिल्पा रणदिवे सह भाजपा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# इतिहास घडवणारी युवा संसद विधान भवनात २९ व ३० जुलै रोजी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

नागपूर येथे एक ऐतिहासिक आणि मानाचा क्षण घडणार आहे – संसद युवा संसद २०२५ हे भव्य आयोजन सकारदृष्टी सोशल फाउंडेशन आणि कॅलिडोहोप यांच्या संयुक्त विद्यमाने २९ आणि ३० जुलै २०२५ रोजी होणार आहे. पहिल्यांदाच हे कार्यक्रम नागपूरच्या प्रतिष्ठित विधान भवनातील खालच्या सभागृहात (विधानसभा) पार पडणार असून, ही एक ऐतिहासिक आणि मान्यवर युवा व्यासपीठ ठरणार आहे; जिथे खरीखुरी विधीमंडळाची चर्चा होते, तिथे आता तरुणांची मते ऐकली जाणार आहेत. या कार्यक्रमात संपूर्ण महाराष्ट्रभरातून २०० हून अधिक प्रतिनिधी सहभागी होणार असून, संविधानात्मक दृष्टिकोनातून विचारमंथन, धोरणनिर्मिती, आणि लोकशाही संवादाच्या माध्यमातून ते सामाजिक प्रश्नांवर चर्चा करतील.

“Places of Worship Act – 1991” या विषयावर तरुणांना संवेदनशील सामाजिक आणि कायदेशीर मुद्द्यांची अभ्यासपूर्ण चर्चा करण्याची संधी मिळणार आहे.

# 'जनमंच 'तर्फे चर्चासत्र

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

'जागतिक अस्थिरतेच्या वातावरणात भारत किती सुरक्षित?' या विषयावर २७ जुलैला जनमंचर्फे बाबुराव धनवटे सभागृह, शंकरनगर चौक येथे सायंकाळी ६ वा. चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. यात संरक्षण मंत्रालय आणि राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे माजी मुख्य सल्लागार ले.ज. (नि) विनोद खंडारे सहभागी होणार आहेत. अध्यक्षस्थानी दै. भास्करचे संपादक प्रकाश दुबे राहतील. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन जनमंचचे अध्यक्ष राजीव जगताप व सचिव विठ्ठलराव जावळकर यांनी केले आहे.

# जागतिक लोकसंख्या दिन साजरा

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. २३ :

युवा कार्यक्रम खेळ मंत्रालय भारत सरकार व तुलसा बहुउद्देशीय संस्था यांच्या अंतर्गत एक दिवशीय जागतिक लोकसंख्या दिवस कार्यक्रम दि, ११/७/२०२५ ला जागतिक लोकसंख्या दिनाच्या निमित्याने दिवस एक दिवसीय कार्यक्रम समाज भवन मोदी पडाव नागसेन नगर कामठी,येथे घेण्यात आलेला आहे, त्यात उपस्थित असलेले प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले वेलकम फाउंडेशन चे अध्यक्ष,धीरज तांबे समाजसेवक पांडुरंग निमकर गिफ्ट फाउंडेशन चे अध्यक्ष डॉ मनीषा ठाकरे, सामाजिक कार्यकर्ता जय रामटेके, व अन्य पदाधिकारी उपस्थित होते,



डॉ मनीषा ठाकरे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष,स्थान ह्यांना मिळाले. त्यांनी प्रस्तावना भाषणामध्ये म्हटले की आपल्या देशाची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे, आणि प्रत्येक समाजातील लोकांनी आपल्या देशातील जास्तीत जास्त लोकांना मदत करून देश उंचवण्याच्या प्रयत्न करायला पाहिजे या सगळ्या गोष्टीवर त्यांनी खूप उच्चपद्धतीने भाषण दिले, त्याचप्रमाणे वेलकम फाउंडेशनचे अध्यक्ष धीरज तांबे यांनी आपल्या देशात होत असलेल्या लोकसंख्यावर विविध ठिकाणी कार्यक्रम घेवून मार्गदर्शन केले व लोकसंखे वर आळा घालण्याकरिता त्यांनी देखील स्वतःचे मत मांडले. त्याचप्रमाणे पांडुरंग निमकर यांनी कार्यक्रमांमध्ये उपस्थित राहून म्हटलं आहे की जर देश प्रगती पथावर न्यायचा असेल तर लोकसंख्येला आळा घालावा लागेल तेव्हाच आपला देश प्रगत होऊ शकतो त्याचप्रमाणे जय रामटेक यांनी समाजामध्ये चाललेल्या रुढी रीती रिवाज परंपरा यावर देखील त्यांनी भाषण दिले, आणि कार्यक्रमात चहा नाश्ता देऊन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला,

# दिल्ली पब्लिक स्कूल, मिहान येथे विद्यार्थी परिषद पदग्रहण समारंभ



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

दिल्ली पब्लिक स्कूल, मिहानने २३ जुलै २०२५ रोजी विद्यार्थी परिषदेचा पदग्रहण समारंभ आयोजित केला होता.या कार्यक्रमाला लेफ्टिनेंट कर्नल निखिल पांडे, अधीक्षक अभियंता, एम्स नागपुर यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

याचबरोबर व्यासपीठावर उपस्थित डीपीएस मिहान आणि कामठी रोडच्या अध्यक्षा आणि प्रो व्हाइस चेअरपर्सन तुलिका केडिया, डीपीएस मिहान आणि कामठी रोडच्या संचालिका सविता जयस्वाल,अनुनय केडिया; डीपीएस कामठी च्या प्राचार्या योगिता उमाळकर आणि डीपीएस मिहान आणि कामठी रोडचे बर्सर इंद्रजीत परगनिहा यांच्याद्वारे दीपप्रज्वलनाने समारंभाची सुरूवात करण्यात आली.

प्राचार्या निधी यादव यांच्या शालेय गुणवत्तेसाठी आवश्यक असलेल्या धोरणांवर मुख्याध्यापिका श्वेता लाडे यांनी आपले विचार व्यक्त केले. प्रमुख पाहुणे निखिल पांडे यांच्याद्वारे प्रणव राज आणि प्रिशा कौल हेडबॉय आणि हेडगर्ल यांच्यासह विद्यार्थी परिषदेच्या पदाधिकारी मंडळास सन्मान चिन्ह (बॅच) व पदक देत शपथ देण्यात आली.

# राजगृह वाचनालयात राजकुमार बोरकर यांचा गौरवपूर्वक सत्कार

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २३ :

धम्म कीर्ती नगर येथील महाप्रज्ञा बुद्ध विहार मधील राजगृह वाचनालयाच्या वतीने सामाजिक व धार्मिक क्षेत्रात कार्यरत अस्मिता मंचाचे अध्यक्ष राजकुमार बोरकर यांचा गौरवपूर्वक सत्कार करण्यात आला.

या सत्कार सोहळ्यात राजगृह वाचनालयाचे अध्यक्ष अशोक वासेकर, सदस्य माणिकराव खोब्रागडे, नानाजी खांडेकर तसेच प्रियदर्शनी गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र कांबळे यांनी शाल, सन्मानचिन्ह, राजगृह वाचनालयाची स्मरणिका व पुष्पगुच्छ देऊन बोरकर यांचा सत्कार केला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राजेंद्र कांबळे यांनी बोरकर यांच्या सामाजिक व धार्मिक कायार्चा संक्षिप्त परिचय दिला. २० जून रोजी मोवाडे लेआउट, दवलामेटी येथील रहिवाशांच्या विवाहाचे आयोजन बोधी मृग



विहार, ईसासनी येथे करण्यात आले होते. तसेच खापरखेडा येथे विविध जाती-धर्मांतील नागरिकांसाठी सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले, त्यामध्येही बोरकर यांचे मोलाचे योगदान होते. आपल्या सत्काराला उत्तर देताना राजकुमार बोरकर म्हणाले, राजगृह वाचनालयाच्या या सन्मानामुळे मला अधिक जोमाने सामाजिक व धार्मिक कार्य करण्याची प्रेरणा मिळाली आहे. आपल्या अपेक्षेनुसार पुढील आयुष्य मी या कायासाठी अर्पण करण्याचा निर्धार करतो. कार्यक्रमाचे संचालन व प्रास्ताविक राजेंद्र कांबळे यांनी तर आभारप्रदर्शन अध्यक्ष अशोक वासेकर यांनी केले.

# झाडे किती लावली यापेक्षा किती जगवली हे महत्त्वाचे आहे : आकाश टाले

## वृक्षारोपणाच्या माध्यमातून स्वर्गवासी वडिलांना अनोखी आदरांजली

■ महासागर प्रतिनिधी, कुही, दि. २३ :

"वडिलांच्या मरणोपरांत त्याच्या स्मरणार्थ झाडे लावण्याचा निर्णय घेतला. माज्या वडिलांनी वयाच्या 59 व्या वर्षी जगाचा निरोप घेतला, त्या प्रित्यर्थ 59 झाडे लावण्याचा संकल्प केला. पण आज 180 झाडे लावून ते जगवण्याचा संकल्प आपण सर्वांना करायचा आहे. किती झाडे लावली हे महत्त्वाचे नसून किती झाडे जगवली हे महत्त्वाचे आहे. असे प्रतिपादन युवा समाज प्रबोधनकार तथा सप्तखंजेरीवादक आकाश टाले यांनी जिवनापूर व सोनेगाव येथील जिल्हा परिषद शाळेतील प्रांगणात वृक्षारोपण प्रसंगी कार्यक्रमात केले.



कुही तालुक्यातील गोसेखुर्द प्रकल्पबाधीत सावंगी (फेगड) येथील सेवाभावी वृत्ती, साधेपणा मुरलीधर टाले यांनी वयोमानानुसार 59 व्या वर्षी जगाचा निरोप घेतला, परंतु त्यांच्या सेवा आणि संस्कारांचे बीज त्यांच्या कुटुंबियांच्या वर्तनात खोलवर रुजले आहे. त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ त्यांचे चिरंजीव आकाश टाले यांनी महाराष्ट्रभर सप्तखंजेरी, समाजप्रबोधनकार करत एक विलक्षण संकल्प केला होता. वडिलांच्या वया इतकी म्हणजे 59 वृक्षांची मुरलीबाग निर्माण करून त्यांना निसर्गमय आदरांजली अर्पण करायची. पण हा संकल्प संख्येपुरता मर्यादित राहिला नाही. लोकांच्या प्रेमामुळे आणि सकारात्मक प्रतिसादामुळे या संकल्पाला उभारी मिळाली आणि प्रत्यक्षात 180 फळझाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. त्यामुळे ही बाग म्हणजे केवळ झाडांचं रोपण नसून एक विचार, एक चळवळ, एक भावनिक बंध आहे. सेवाभाव, निसर्गप्रेम आणि सामाजिक जाणीवेचा संगम आहे, असच म्हणाव लागेल. जिल्हा परिषद शाळा जीवनापूर, सोनेगाव, सावंगी तसेच जीवनापूर येथील हनुमान मंदिर देवस्थान आणि बौद्ध विहार पंचकमेटी या ठिकाणी हे वृक्षारोपण मोठ्या समर्पणाने पार पाडण्यात आले.

या झाडांच्या संगोपनाची जबाबदारी शाळेचे मुख्याध्यापक हितेश रामटेके, गणपत धार्मिक, पवाळे, डाकराम नरुले आणि त्यांच्या सहकारी शिक्षकांसोबत विद्यार्थांनी स्वखुशीने स्वीकारली. या उपक्रमात आंबा, चिकू, पेरू, सीताफळ, संत्र, मोसंबी, काजू, अंगूर यासारख्या विविध फळझाडांची लागवड करण्यात आली. प्रत्येक झाडामागे एक आठवण, एक भावना, एक गोष्ट जपली आहे. एक कुटुंब, एक झाड या संकल्पनेला या प्रसंगी उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

प्रसंगी जिवनापूर सरपंच सविता शिवरकर, उपसरपंच अनिल कुकुडकार, सरपंच सौरव आंबोणे, उपसरपंच जगदीश बांते, मुख्याध्यापक हितेश रामटेके, गणपत धार्मिक, रमाकांत शेंडे, डाकराम नरुले, मनोहर हारगुडे, दिलीप चव्हाण, भगवान पाटील, खुशबू मेंडवाडे, शरद शहारे, गोपाल नान्हे, हरिष पाटील, योगेश फेंडर, विमल शिवरकर, आकाश नरुले, संजय बोरघरे, संदीप दुधपचारे, वंदना शिवरकर, भारती दुधपचारे, माला भैसारे, प्रमिला दुधपचारे उपस्थित होते.

# भाजपा वाडी मंडळाने रक्तदान करुन मुख्यमंत्र्याचा वाढदिवस साजरा

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २३ :

दत्तवाडीतील गजानन सोसायटी मधील श्री संत गजानन महाराज मंदीर परिसरात. भाजपा वाडी मंडळाच्या वतीने महाराष्ट्राचे तडफदार, लोकप्रिय व विकासाचे शिल्पकार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.



या उपक्रमासाठी अर्पण व्हॉलंटरी ब्लड बँक, नागपूर यांचे विशेष सहकार्य लाभले. डॉक्टर एन. के. तातेड आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या मार्गदर्शनात एकूण ३९ रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत रक्तदान केले. या वेळी महाराष्ट्र प्रदेश परिषद सदस्य नरेश चरडे,भाजपा वाडी मंडळाचे पदाधिकारी पुरुषोत्तम रागीट, आनंदबाबू कदम, कैलाश मंथापुरवार, अभिजित जोशी, केशव बांदरे, सरीता यादव, कल्पना सगदेव,गोविंदराव रोडे, कमल कनोजे, अक्षय तिडके, ईशांत राऊत, विजय मेंढे,विपीन वर्मा, अमेंद्र सिंह, जयंत वैद्य, विशाल डोंगरे, डॉ. मनोज भांगे, राजेंद्र तिवारी, चंद्रशेखर देशभ्रतार, शंकर कडू, प्रदीप वंजारी, ज्ञानेश्वर गावंडे, लिलाधर भोयर, राहुल तायडे, राजू शेळके, आकाश पवार, राहुल बंसोड, हिमांशु पारधी, आनंद यादव, विनोद सदार, मिलिंद कोकाटे, नितीन अन्नपूर्णे, मंगला पडोळे, रंजीता यादव, वर्षा शिंगरू, आभा पांडे, सुरेखा बांदरे, सुधा पवार, लक्ष्मी बैस, रेखा कोराम, पुष्पा वरगंटीवार, अंजली कुळकर्णी उपस्थित होते. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व सहभागी पदाधिकारी, रक्तदाते आणि स्वयंसेवकांचे विशेष कौतुक करण्यात येत आहे.

# खंडणी वसुलीत गुंडाला अटक

नागपूरः चाकूचा धाक दाखवून दुकानदाराला खंडणी मागणाऱ्या गुंडाला जरीपटका पोलिसांनी अटक केली. पुणेश गुलाबसिंग ठाकरे (25) रा. मिसाळ लेआऊट असे अटकेतील गुंडाचे नाव आहे. या प्रकरणी पोलिसांनी सौरभ सुरेंद्र हलमकर (23) रा. इंदोराच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. सौरभ हा मिसाळ लेआऊटच्या मंगळवारी बाजारात चायनीजचा ठेला लावतो. 3 महिन्यांपूर्वी आरोपी पुणेश त्याच्या दुकानात आला. तू कोणाला विचारून येथे ठेला लावला. मला ओळखत नाही का, मी गोळीबार केला आहे. तुला येथे ठेला लावायचा असे तर दरमहिन्याला 500 रुपये खंडणी द्यावी लागेल, अशी धमकी देऊन निघून गेला. शुक्रवारी रात्री पुणेश पुन्हा सौरभच्या ठेल्यावर आला. ग्राहकांच्या समोर त्याला धमकावत आत्ताच्या आता 2 हजार रुपये असे म्हणून खंडणी मागितली. सौरभने पैसे नसल्याचे म्हटले असता आरोपीने चाकू काढला.

# भररस्त्यात महिलेची गळा चिरून हत्या; मुलगी आणि जावयाला अटक



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ जुलै:

तोंडाला रुमाल बांधून आलेल्या एका व्यक्तीने भररस्त्यात चाकूने गळा चिरून एका महिलेची निर्घृण हत्या केली. सिव्हील लाईन्स सारख्या गजबजलेल्या परिसरात दिवसाढवळ्या ही थरारक घटना घडल्याने पोलिस विभागात खळबळ उडाली आहे. सीताबर्डी पोलिसांसह गुन्हे शाखेच्या वेगवेगळ्या पथकांनी तपास सुरू केला आणि काही तासांतच आरोपीला शोधून काढले. आरोपी हा मृत महिला माया मदन पसेरकर (४८) रा. जवाहर विद्यार्थी गृहामागे, सिव्हील लाईन्स यांचा जावईच निघाला. मुस्तफा खान मोहम्मद खान (२२) रा. गजानननगर, एमआयडीसी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

पसेरकर कुटुंब हे शासकीय कार्यालयांमध्ये काम करते. मंगळवारी दुपारी २.१५ वाजताच्या सुमारास माया काम आटोपून पायदळ घरी जात होत्या. या दरम्यान तोंडाला रुमाल बांधून असलेल्या एका व्यक्तीने त्यांचा पाठलाग केला. कलाकुंजसमोर त्याने माया यांच्यावर मागून हल्ला केला. तीक्ष्ण शस्त्राने गळा चिरून फरार झाला. डोळ्यासमोर ही थरारक घटना पाहून रस्त्याने ये-जा करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. माया यांचे घर घटनास्थळापासून जवळच असल्याने कुटुंबीयही तेथे पोहोचले. तोपर्यंत माया यांचा मृत्यू झाला होता. माहिती मिळताच सहआयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलिस उपायुक्त नित्यानंद झा आणि मोठ्या संख्येत पोलिस घटनास्थळी पोहोचले. मारेकऱ्याचा कोणताही सुगावा नव्हता. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासण्यास सुरूवात केली. एका फुटेजमध्ये तो माया यांचा पाठलाग करताना आणि गुन्हा करून पळताना दिसला. एसीपी अभिजित पाटील यांच्या मार्गदर्शनात गुन्हे शाखा युनिट २च्या पथकाने कुटुंबीयांची चौकशी सुरू केली. एसीपी अभिजित पाटील यांच्या मार्गदर्शनात गुन्हे शाखा युनिट २च्या पथकाने कुटुंबीयांची चौकशी सुरू केली.

## ५ लाख रुपये दिले होते उसणे

कुटुंबाची माहिती घेतली असता समजले की, माया ही मदन पसेरकर (६०) यांची तिसरी पत्नी होती. मदन यांची पहिली पत्नी सोडून गेली, तर दुसरीचे निधन झाले होते. मदनला दुसऱ्या पत्नीपासून दोन मुले आणि गीता नावाची एक मुलगी आहे. गीताचे मुळचा हरीयाणा येथील रहिवासी मुस्तफा खान नावाच्या व्यक्तीशी प्रेमसंबंध होते. ४ वर्षांपूर्वी दोघांनीही प्रेमविवाह केला होता. गीताचे यापूर्वी दोन लग्न झाले असून आरोपी मुस्तफा हा तिसरा पती आहे. मुस्तफाने मायाला ५ लाख रुपये उसणे दिले होते. मायाने ही रक्कम परत केली नव्हती. यावरून मुस्तफाचा मायाशी वाद झाला होता. पोलिसांना माहिती मिळाली आहे की, घटनेच्या पूर्वी मायाचे गीतासोबतही बोलणे झाले होते. चौकशीत गीताने सांगितले की, मुस्तफाने मायाला पैसे उसणे दिले होते. संशयाची सुई मुस्तफावर येऊन थांबली. पोलिसांनी तत्काळ मुस्तफाचा शोध सुरू केला आणि हिंगणा परिसरातून त्याला अटक केली.

## पतीशी संबंध तोडण्यासाठी मुलीवर दबाव

चौकशीत मुस्तफाने सांगितले की, त्याने मायाला ५ लाख रुपये उसणे दिले होते. ही रक्कम परत करण्यास माया टाळाटाळ करीत होती. तसेच गीताला मुस्तफाशी संबंध तोडण्यासाठी दबाव टाकत होती. मंगळवारीही तो पैसे मागण्यासाठी मायाकडे गेला होता. मात्र तिने थेट नकार दिला होता. त्यानंतर मुस्तफाने तिला ठार मारण्याचा निश्चय केला होता. त्याने डी-मार्टमधून मंगळवारीच चाकू आणला होता. घरून निघाल्यापासून तो मायाचा पाठलाग करीत होता. तिला एकटे गाठून हल्ला केला. पुढील कारवाईसाठी मुस्तफाला सीताबर्डी पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आले आहे.

# विद्यार्थिनीवर सामूहिक अत्याचार

## ६ आरोपींना अटक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

महाविद्यालयात शिकणाऱ्या एका अल्पवयीन विद्यार्थिनीवर 10 युवकांनी सामूहिक अत्याचार केल्याचा खळबळजनक प्रकार हुडकेश्वर पोलिस ठाण्यांतर्गत उघडकीस आला आहे. या प्रकरणात पोलिसांनी पीडितेच्या तक्रारीवरून आरोपींविरुद्ध सामूहिक अत्याचार, पीटा ॲक्ट आणि पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करीत 6 आरोपींना अटक केली. अटकेतील आरोपींपैकी दोघे नागपुरातील तर चार आरोपी यवतमाळचे आहेत. न्यायालयाने त्यांना 24 जुलैपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. या प्रकरणात आणखी आरोपी वाढण्याची शक्यता आहे.

पीडित मुलगी साडेसतरा वर्षांची असून ती एका महाविद्यालयातून बी.ए. प्रथम वर्षाचे शिक्षण सुरू आहे. गत 11 जुलै रोजी ती अचानक घरुन निघून गेली. पालकांच्या तक्रारीनंतर हुडकेश्वर पोलिसांनी तिला 3 तासातच शोधून पालकांच्या ताब्यात दिले. मात्र 16 जुलै रोजी ती पुन्हा बेपत्ता झाली. कुटुंबीयांनी शोध घेतला. मात्र, ती कुठेच मिळून आली नाही. त्यामुळे कुटुंबीयांनी हुडकेश्वर ठाण्यात तक्रार दिली. तक्रारीवरून पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल केला. दरम्यान नागपुरातील दोन मित्रांच्या ती संपर्कात आली. ते तिला निर्जन स्थळी घेवून गेले. तिच्यावर अत्याचार केला नंतर सोडून दिले. त्याच दिवशी ती यवतमाळला गेली. अपहरणाचा गुन्हा दाखल असल्याने वरिष्ठ पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर भेदोडकर यांच्या मार्गदर्शनात पोलिस पथक तिचा शोध घेत होते. ती यवतमाळच्या मादणी येथे असल्याची माहिती पोलिस पथकाला मिळाली. पीडित मुलीचे कुटुंब आणि हुडकेश्वर पोलिस 18 जुलै रोजी यवतमाळला गेले. स्थानिक पोलिसांच्या मदतीने तिला ताब्यात घेतले आणि त्याच दिवशी नागपुरात परतले. पीडितेने महिला अधिकाऱ्यासमोर आपबीती सांगितली. पोलिसांनी तिचे बयान नोंदवून घेतले. त्यावरून सामूहिक अत्याचार, पीटा ॲक्ट आणि पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केला. तत्पूर्वी पीडितेची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. वपोनि भेदोडकर यांच्या पथकाने चोवीस तासात आरोपींच्या मुसक्या आवळल्या. नागपुरातील दोन आणि यवतमाळातील चार असे 6 आरोपी अटक केले. त्यांना न्यायालयाने 24 जुलैपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. दरम्यान या प्रकरणात आणखी किती आरोपी आहेत. याचा पोलिस तपास करीत असून लवकरच उर्वरीत आरोपींनाही अटक करण्यात येईल, अशी माहिती वपोनि भेदोडकर यांनी दिली.

जवळपास वर्षभरापूर्वी पीडितेची यवतमाळच्या एका तरुणाशी इंस्टाग्रामवरून ओळख झाली. दोघांनीही एकमेकांचे मोबाईल नंबर घेतले आणि बोलचाल सुरू झाली. आरोपी तरुणाने पीडितेला प्रेमाच्या जाळ्यात अडकवले. त्यानंतर त्याने तिला भेटण्यासाठी यवतमाळला बोलाविले. 16 जुलै रोजी ती त्याच्याकडे गेली. तो तिला मादणी येथे मित्राच्या खोलीवर घेऊन गेला. तत्पूर्वी त्याने इतर मित्रांनाही याबाबत माहिती दिली होती. तेथे चौघांनी मिळून पीडितेवर आळीपाळीने अत्याचार केला. तिने प्रतिकार केला असता मारहाणही केली.

## विदर्भातील शेतकऱ्यांचा एआय तंत्रज्ञानासाठी बारामतीला अभ्यास दौरा

# कृषी प्रगतीसाठी ॲंग्रोव्हिजन फाउंडेशनचा पुढाकार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

विदर्भातील ५५ प्रगतिशील शेतकऱ्यांचा एकदिवसीय अभ्यास दौरा ॲंग्रोव्हिजन फाउंडेशनच्या पुढाकारातून बारामती येथे यशस्वीरित्या पार पडला. या दौऱ्याचा प्रमुख उद्देश कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा उपयोग करून कृषी क्षेत्रात होणाऱ्या बदलांचे प्रत्यक्ष निरीक्षण व ज्ञान मिळवणे हा होता.

केंद्रीयमंत्री आणि ॲंग्रोव्हिजनचे प्रमुख मार्गदर्शक नितीन गडकरी यांच्या प्रेरणेने आयोजित या अभ्यास दौऱ्यादरम्यान शेतकऱ्यांनी बारामती कृषी विज्ञान केंद्रातील अक तंत्रज्ञानाने विकसित उसाच्या मॉडेल प्लॉटला भेट दिली. याठिकाणी प्रगतीशील




शेतकरी सुनील भगत आणि आदित्य भगत यांच्या एकरी १४० टन उत्पन्न देणाऱ्या उसाच्या शेतीमुळे शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

भैय्यासाहेब पवार सभागृहात झालेल्या सत्रात अक संदर्भात तज्ज्ञ डॉ. विवेक भोईटे आणि डॉ. योगेश फाटके यांनी सविस्तर प्रेझेंटेशन दिले आणि उपस्थित शेतकऱ्यांच्या शंका, प्रश्नांचे समाधान केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केविकेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र पवार होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या कृषी क्षेत्रातील कायार्चे कौतुक करताना सांगितले की, कष्टशिवाय यश नाही. जिद्द, चिकाटी नसेल तर प्रगती शक्य नाही. विदर्भामध्ये खूप मोठे पोटेन्शियल आहे. नैराश्य झटकून एकाग्रता ठेवा, कारण आपल्यासारख्या शेतकऱ्यांच्या पाठीशी नितीन गडकरींसारखे नेते ठामपणे उभे आहेत. ॲंग्रोव्हिजन फाउंडेशनचे अध्यक्ष रविंद्र बोरटकर यांनी फाउंडेशनच्या कायार्चा आढावा घेतला, तर विश्वस्त सुधीर दिवे यांनी विदर्भातील कृषीस्थिती आणि केविकेच्या सहकार्याबाबत आपले विचार मांडले. या दौऱ्यात मानस उद्योग समूहाचे प्रबंध संचालक डॉ. समय बनसोड, ॲड. विजय जाधव, सुनील सहापुरे, नितीन कुलकर्णी, डॉ. पिनाक दंदे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे अतिरिक्त खाजगी सचिव प्रवीण भालेराव, अमोल बिराजदार, मानस समूहाचे महाव्यवस्थापक जयंत ढगे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. विदर्भातील शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी प्रत्यक्ष परिचय घडवून देणारा हा दौरा यशस्वी ठरल्याचे समाधान शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर झळकत होते.

# वीज पडून महिलेचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी,
कुही, दि. २३ :



स्वतःचे शेतात धानाचे पऱ्हा निंदण करण्यासाठी गेलेल्या 52 वर्षीय महिलेचा वीज पडून मृत्यू झाल्याची घटना 23 जुलै बुधवारला सायंकाळी 5 वाजताच्या सुमारास घडली. कांता नारायण खोब्रागडे वय 52 वर्षे राहणार वेलतुर असे मृतक महिलेचे नाव आहे.


सदर महिला शेतात निंदण करीत असताना अचानक पाऊसाला सुरुवात झाली. अशातच आकाशात गडगडाट होऊन वीज पडून कांता नारायण खोब्रागडे वय 52 राहणार वेलतुर या महिलेचा मृत्यू झाला.

घटनेची माहिती वेलतुरचे ठाणेदार प्रशांत मिसाळे व मंडळ अधिकारी आशीष धनविजय आणि तलाठी आनंद मस्के यांना देण्यात येऊन त्यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. मृतदेह प्राथमिक आरोग्य केंद्र वेलतुर येथे आणले असता येथील डॉक्टरनी शवविच्छेदन साठी मृतदेह ग्रामीण रुग्णालय कूही येथे पाठविला. याप्रकरणी वेलतुर पोलीसात अकस्मात मृत्यूची नोंद केली असून तपास वेलतुर पोलीस करीत आहेत.

# गोंडखैरी कोळसा प्रकल्प

## पर्यावरणाला हानी पोहोचवल्याशिवाय केले जाणार खाणकाम

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २३ :



नागपूरजवळील गोंडखैरी भूमिगत कोळसा ब्लॉक अशा प्रकारे विकसित केला जाईल की गावे आणि जंगलांना कमीत कमी नुकसान होईल. ही कोळसा खाण स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेद्वारे अदानी पॉवर लिमिटेडला देण्यात आली असून भूमिगत तंत्रज्ञानाचा वापर करून दरवर्षी २० लाख टन कोळसा काढला जाईल.

हा प्रकल्प पर्यावरण-संवेदनशील संसाधनांच्या शोषणासाठी एक उदाहरण निर्माण करेल. पारंपारिक ओपन-कास्ट खाणकामाच्या विपरीत, गोंडखैरी प्रकल्पात पृष्ठभागावर कोणताही मोठा अडथळा येणार नाही. एकूण ८६२ हेक्टर क्षेत्रफळावर पसरलेल्या या ब्लॉकमध्ये ८७.३५१ हेक्टर महसूल वनजमीन देखील समाविष्ट असून ती पूर्णपणे अबाधित ठेवली जाईल, कारण येथे कोणतीही पायाभूत सुविधा विकसित केली जाणार नाही किंवा खाणकाम केले जाणार नाही. या भूमिगत खाण प्रकल्पाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे झाडे तोडण्याची किंवा जंगलांचे नुकसान होण्याची भीती नाही, जी आजच्या काळात पर्यावरणवादी आणि स्थानिक समुदायांसाठी एक मोठी चिंता आहे. कंपनी केवळ खाजगी जमिनीवर खाण प्रवेशद्वार आणि इतर पायाभूत सुविधा बांधेल. अशा प्रकारे, वनक्षेत्रातील जैवविविधता आणि हिरवळ पूर्णपणे संरक्षित केली जाईल.

ही भूमिगत पद्धत केवळ जैवविविधतेचे संरक्षण करत नाही तर पर्यावरणीय संवर्धनाच्या मूलभूत तत्त्वांशी देखील सुसंगत आहे. प्रकल्पाने सादर केलेल्या वन वळवण्याच्या प्रस्तावातून स्पष्टपणे दिसून येते की गोंडखैरी कोळसा ब्लॉक सर्व नियामक तरतुदींचे, विशेषतः पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पूर्ण पालन करून विकसित केला जाईल.

पर्यावरण संरक्षणाव्यतिरिक्त, गोंडखैरी भूमिगत कोळसा खाण प्रकल्प या प्रदेशात महत्त्वपूर्ण सामाजिक-आर्थिक फायदे देखील सुनिश्चित करेल. हा एक बहुप्रतिक्षित प्रकल्प आहे कारण त्यासाठी कोणत्याही व्यक्तीचे पुनर्वसन आवश्यक नाही आणि विदर्भ प्रदेशातील २५०० हून अधिक लोकांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

# तुकाराम चाळीत रस्त्यावरच वाहने



तुकाराम चाळीत रस्त्याच्या दोन्ही बाजूला उभी असलेली वाहने

नागपूर, दि. २३

सदर येथील गांधी चौकापासून रेडक्रॉस मार्गावरील तुटलेल्या बगिच्याजवळील तुकाराम चाळीच्या रस्त्यावर अनेक वाहनचालक रस्त्याच्या दोन्ही बाजूला आपली वाहने उभी करून जात असल्याने रस्त्याने येजा करणाऱ्या आणि त्या परिसरातील लोकांना बराच त्रास होतो.

सदर येथे बाजारपेठ असून अनेक दुकाने आहेत. प्रत्येक दुकानादारांकडे चारचाकी वाहने आहेत. मात्र, आधीच येथे अरूंद रस्ते असल्याने येथे वाहतुकीची मोठी समस्या आहे. काही दुकानदार आपल्या दुकानासमोर वाहने उभी करून वाहतुकीला अडथळा आणतात. मात्र, ज्या दुकानदारांची दुकाने आत आहेत त्यांना त्यांची वाहने उभी करायला जागाच नाही. त्यामुळे हे लोक तुकाराम चाळीत रस्त्याच्या दोन्ही बाजूला आपली वाहने उभी करून निघून जातात. रस्त्याच्या वळणावर वाहने उभी करण्यात येत असल्याने दुसऱ्या बाजूने कोण येतोय हे दिसून येत नाही. या परिसरात शाळकरी मुलांची मोठी संख्या आहे. त्यामुळे मोठी घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. लोकांना होत असलेला त्रास वाहतूक पोलिसांना कसा दिसत नाही अशी पृच्छा या परिसरातील लोकांनी केली आहे. अवैधरित्या पार्क केलेल्या या गाड्यांवर वाहतूक पोलिसांनी कारवाई करून तेथे नो पार्किंगचा

# महासागर प्रभाग वार्ता

## रस्त्याच्या कामामुळे पादचारी त्रस्त

महासागर प्रभाग मित्र
नागपूर, दि. २३

प्रभाग क्र. २९ मधील नवीन नरसाळा परिसरातील एसटीपी प्लांट लगत दीड महिन्यांपासून रस्त्याचे काम कासवगतीने सुरू असल्याने पादचाऱ्यांना बराच मन:स्ताप करावा लागत आहे.

या परिसरात राहणाऱ्या लोकांना ये जा करण्यासाठी दुसरा रस्ता नसल्याने याच मार्गाचा वापर करतात. रस्त्याच्या कामासाठी गिट्टी आणि मुरूम आणण्यात आला. गिट्टी आणि मुरूमाचे दगड रस्त्यावरच टाकण्यात आले आहे. त्यामुळे पादचाऱ्यांना तर त्रास होतोच सोबतच आतमध्ये वाहने देखील जात नाहीत. एसटीपी प्लांटजवळून जाणारा हा रस्ता भिंतीलगत बाजूलाच चिमूरकर ब्लाऊजपासून जय महाकाली सोसायटीपर्यंत तयार व्हायला पाहिजे होता. प्लांटची भिंतीपर्यंत रस्त्याचे अर्धवट काम करण्यात आले. त्यानंतर पुढे काम थांबविण्यात आले.

स्थानिक रहिवाशी विशाल कोरके यांना ही माहिती समजताच त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून रस्त्याचे काम त्वरित पूर्ण करावे आणि पुढे १०० मिटरचे देखील काम करावे अशी मागणी केली. या मागण्या त्वरित पूर्ण कराव्यात अशी मागणी कोरके, किशोर कयारकर, किशोर रंदई, चोपडे, भांडेकर, पारधी, रूद्राकार, कावळे, सुनील वाघमारे यांनी केली आहे.

# रस्त्यावरच मोकाट जनावरांचा बस्तान

प्रमोद जांभुळकर
नागपूर, दि. २३



प्रभाग क्र. ७ मधील इंदोरा ते जरीपटका मार्गावर मोकाट जनावरांनी रस्त्यावरच बस्तान मांडल्याने वाहतुकीचा खोळंबा झाला आहे.

दुधाचा व्यवसाय करणारे काही पशुपालकांची ही जनावरे आहेत. सकाळी दूध काढल्यानंतर हे पशुपालक आपल्या जनावरांना मोकाट सोडून देतात. त्यानंतर ही जूावरे रस्त्यावर आपले बस्तान मांडतात. या परिसरात दररोज हे चित्र पहायला मिळते. या परिसरात अनेक शाळा आणि दवाखाने आहेत. सकाळी आणि सायंकाळी या रस्त्यावर प्रामुख्याने गर्दी असते. मोकाट जनावरे रस्त्यावर बसून असल्याने वाहतुकीला अडथळा होतो. त्याचप्रमाणे रुग्णवाहिका आणि शालेय विद्यार्थ्यांची वाहने देखील अडकून पडतात. अचानकपणे जनावर पुढे आल्यास वाहनचालकांना करकचून ब्रेक मारावा लागतो. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे. ही समस्या त्वरित न सोडविल्यास समस्या आणखी बिकट होण्याची शक्यता आहे. तरी मनपा प्रशासनाने या गंभीर समस्येची त्वरेने दखल घ्यावी अशी मागणी अजय दत्ता, दिलीप भोतमांगे, राजेश राऊत, भुनेश्वर उके, तन्मय टेंभुर्णे, राजेश पांडे यांनी केली आहे.

# शेंडेनगरात बेवारस कुत्र्यांचा हैदोस

किरण मेश्राम
नागपूर, दि. २३

प्रभाग क्र. २ येथील शेंडेनगर, टेका आणि आजूबाजूच्या परिसरात बेवारस कुत्र्यांचा हैदोस वाढला असता नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

कामठी मार्गावरील, शेंडेनगर, टेका नाका, सिद्धार्थनगर, नारी रोड या परिसरात बेवारस कुत्र्यांची भटकंती सुरू असते. टोळीने हे कुत्रे फिरत असतात. एखादा वाहनचालक जोरात वाहन चालवित गेल्यास कुत्रे त्याच्या मागे धावतात. कुत्र्यांच्या भितीपोटी वाहनचालक वाहनासह पडू शकतो. काही दिवसांपूर्वी वर्धा येथे राहणारी एक ५ ते ६ वर्षीय चिमुकली आपल्या पित्यासह शेंडेनगर येथील नातेवाईकांच्या घरी आली होती. सकाळच्या वेळी ती मुलगी मंजन करीत असताना बेवारस कुत्र्यांनी तिच्यावर हल्ला केला. परिसरात राहणाऱ्या लोकांच्या लक्षात हा प्रकार येताच त्यांनी धाव घेतली आणि कुत्र्यांच्या तावडीतून मुलीला सोडविले. तोपर्यंत कुत्र्यांनी मुलीचे कपडे फाडून टाकले होते असे त्या परिसरातील लोकांनी सांगितले.

या परिसरात शाळा देखील आहेत. सुटीच्या वेळी काही मुले खाऊ घ्यायला दुकानात जातात. मुलांच्या हातात खाऊचे पाकीट दिसले की, कुत्रे त्यांच्यावर तुटून पडतात. त्यामुळे शाळकरी मुले सुटीमध्ये शाळेतून बाहेर पडतच नाहीत अशी माहिती आहे. त्याचप्रमाणे बेवारस कुत्र्यांच्या भितीपोटी नागरिक देखील आपल्या लहान मुलांना घराबाहेर पडू देत नाहीत. त्यामुळे मनपा प्रशासनाने या कुत्र्यांचा त्वरित बंदोबस्त करावा अशी मागणी करण्यात येत आहे.

# बिनाकी मंगळवारी तलावाचे काम ४ महिन्यांपासून रखडले



हरेश निमजे
नागपूर, दि. २३

प्रभाग क्र. ५ मध्ये येणाऱ्या बिनाकी मंगळवारी येथील तलावाच्या सौंदर्यीकरणाचे काम चार महिन्यांपासून रखडल्याने या मार्गाने येजा करणाऱ्या वाहनचालकांना कमालीची कसरत करून वाटचाल करावी लागते.

बिनाकी मंगळवारी ते पोळा मैदान दरम्यान हा तलाव आहे. काही दिवसांपूर्वी तलावाचे सौंदर्यीकरणाचे काम हाती घेण्यात आले होते. मात्र, चार महिन्यांपासून काम रखडले आहे. तलावाच्या आतमध्ये लोखंडी सळाखी उघड्यावर पडली आहेत. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने तलावाच्या दोन्ही बाजूला लोखंडी पत्रे लावण्यात आली होती. परंतु, पावसाळ्याच्या दिवस असल्याने वाऱ्यामुळे लोखंडी पत्रे देखील उखडून पडली आहेत. तलावाच्या काठावर संरक्षित भिंत बांधावी यासाठी मनपा आयुक्त अभिजीत चौधरी यांना अनेकदा निवेदने दिली. परंतु, त्यांनी काहीच लक्ष दिले नाही. ७ जुलै रोजी तीन दिवस शहरात मुसळधार पाऊस झाला होता. त्यामुळे तलावातील पाणी बाहेर येऊन लोकांच्या घरात शिरले होते. त्यामुळे लोकांचे मोठे नुकसान झाले. तरी, प्रशासनाने बिनाकी मंगळवारी तलावाचे काम त्वरेने करावे यासाठी मनपा आयुक्त अभिजीत चौधरी यांना नुकतेच निवेदन दिले.

# खड्डा दिसला की, लावा झाड

## आपचा अनोखा उपक्रम

महासागर प्रभाग मित्र
नागपूर, दि. २३

पावसाच्या पाण्यामुळे शहरातील अनेक भागात रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडून असून डांबरी रस्ते देखील उखडल्याने वाहनचालकांना होणारा त्रास लक्षात घेता आप पक्षाच्या कार्यकर्त्यांनी जेथे खड्डा, तेथे झाड लावण्याचा उपक्रम सुरू केला आहे.

उखडलेल्या रस्त्याची डागडुजी करण्यात यावी अशी मागणी आपच्या कार्यकर्त्यांनी अनेकदा केली होती. परंतु, त्यांच्या मागणीला केराची टोपली दाखविली. त्यामुळे कार्यकर्ते संतप्त झाले आणि त्यांनी गितेनगर परिसरात खड्ड्याच झाडे लावण्याचा उपक्रम सुरू केला.

मंगळवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस होता. त्यांना भेट म्हणून हा उपक्रम सुरू केल्याचे कार्यकर्त्यांनी सांगितले. ज्या प्रमाणात शहरातील रस्त्यांची अवस्था दिसत आहे त्या कामात भ्रष्टाचार झाल्याचे दिसून येत आहे. विकास कामाच्या नावाखाली लोकांच्या पैशाची बरबादी करण्यात येत असल्याचे कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे.